# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: ttp://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in




जा.क्र.पुअहोसोविसो/पी.जी.प्रवेश विभाग/२०२४/ १४४९ दि. २७/०५/२०२४

प्रति,

मा.प्राचार्य/प्राचार्या,

प्रस्तुत विद्यापीठ सर्व संलग्नित व स्वायत्त् महाविद्यालये, व विद्यापीठ शैक्षणिक संकुले

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदवी प्रथम वर्षाकरिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया बाबत..

संदर्भ : १. विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/परीक्षा विभाग /२०२४-२५/११९६ दि. १७/०५/२०२४

२. विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/परीक्षा विभाग /२०२४-२५/१२३२ दि. २२/०५/२०२४

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय व विषयास अनुसरून कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सर्व संलग्नित महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश प्रक्रियेव्दारे ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया व पात्रता करण्यात येणार आहे. विद्यापीठ स्तरावरून गुणवत्तेनुसार केंद्रीय पध्दतीने राबविण्याचे विद्यापीठाने निश्चित केले आहे. याकरिता मा. कुलगुरू महोदय व प्र-कुलगुरू महोदय यांच्या उपस्थितीत विविध महाविद्यालयाचे प्राचार्य/प्राचार्या तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयाचे व संकुलाचे कर्मचारी यांच्या समवेत दि. २२/०५/२०२४ रोजी बैठक संपन्न झाली आहे.

सदर बैठकीत सर्वानुमते केंद्रीय प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घ्यावयाचे निश्चित झाले. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेबाबतची जाहिरात देणे, नियमावली तयार करणे, पहिली , दुसरी व तिसरी गुणवत्ता यादी तयार करणे इत्यादी तारखांचा तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

प्रवेशासाठीची लिंक पुढीलप्रमाणे आहे. - https://pahsu.admissiondesk.org

| | | |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज भरण्याचा सुरवातीचा दिनांक | २७/०५/२०२४ |
| २. | ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | १०/०६/२०२४ |
| ३. | महाविद्यालय व प्रवर्गनिहाय पहिली गुणवत्तायादी प्रसिध्द करावयाचे दिनांक | १३/०६/२०२४ |
| ४. | पहिली गुणवत्ता यादी लागल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | २०/०६/२०२४ |
| ५. | दुसरी गुणवत्ता यादी प्रसिध्द करावयाचा दिनांक | २५/०६/२०२४ |
| ६. | तिसरी व अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करावयाचा दिनांक | २८/०६/२०२४ |
| ७. | तिसरी गुणवत्ता यादी लागल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | ३०/०६/२०२४ |

तिसरी फेरीनंतर जर महाविद्यालयात रिक्त जागा असतील तर त्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनांच प्रवेश महाविद्यालयास्तरावर देण्यात यावेत.

प्रत्येक प्रवेश फेरीमधून रिक्त राहीलेल्या जागाची व प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांची प्रवर्गनिहाय माहिति महाविद्यालयाने प्रत्येक प्रवेश फेरीनंतर दर दोन दिवसात दु. ३.०० वा. पर्यंत विद्यापीठास कळविणे बंधनकारक आहे.

वरील प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्रवेशासंदर्भात योग्य ती कार्यवाही आपल्या महाविद्यालयातीनी स्तरावरून दिलेल्या मुदतीमध्ये विहित मुदतीमध्ये वेळेत पूर्ण करावे आणि ज्या सुचना विद्यार्थ्यांना देण्याबाबत निर्णय झाला आहे. अशा बाबी देखील आपल्या स्तरावरून संबंधित विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. म. स. रोकडे)
उपकुलसचिव

प्रत - माहितीस्तव

१) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

२) मा. प्र. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

३) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

४) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत - माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव

५) संबंधीत फर्म